# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

"In Pursuit of Technical Excellence"

☎ - office: (0240) 2366101, 2366102, 2366111

e-mail – office.gecaurangabad@dtemaharashtra.gov.in web : www.geca.ac.in


जा.क्र.शाअमछसं/निर्लेखन/ 2024-25/ 445 दि. 31.01.2025

## जाहीर प्रगटन

संस्थेच्या विद्युत अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी व ग्रंथालय विभागातील आयुष्यमान संपलेली व निर्लेखित करण्यात आलेल्या यंत्रसामुग्री व उपकरणांची खालील अटीवर विभागवार विक्री करावयाची असुन त्या करीता इच्छुक खरेदीदारांकडून दर पत्रक मागविण्यात येत आहेत.

1. इच्छुक खरेदीदाराने संपूर्ण उपकरणे व यंत्रसामुग्री आहे त्या ठिकाणी व आहे त्या स्थितीत खरेदी करणे आवश्यक आहे.
2. संस्थेतर्फे ठरविण्यात आलेल्या किमान दराप्रमाणे अथवा त्यापेक्षा जास्त दराने खरेदी करणाऱ्यास यादीतील यंत्रसामुग्री व उपकरणांची विक्री करण्यात येईल.
3. लोडींग अनलोडींग तसेच वाहतुकीचा संपुर्ण खर्च खरेदीदारकडे राहील.
4. विक्रीची एकूण रक्कम रोख अथवा डी.डी.व्दारे कार्यालयात भरुन त्याची पावती सादर केल्याशिवाय कोणतीही यंत्रसामुग्री व उपकरणे संस्थेबाहेर नेता येणार नाहीत.
5. यंत्रसामुग्री व उपकरणे लोडींग / अनलोडींग करते दरम्यान तसेच वाहतुकी दरम्यान कोणतीही अनूचीत घटना अथवा नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संस्थेवर राहणार नाही.
6. विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या संपूर्ण उपकरणांची यादी सोबत जोडलेली आहे त्या यादीनुसार किमान विक्री किंमतीपेक्षा जास्तीत जास्त दर सादर करणाऱ्यास सदर उपकरणांची विक्री करण्यात येईल.
7. खरेदीदाराने आपले दर स्वतंत्र सिल बंद लिफाफ्यात भरुन दि. 11/02/2025 रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.तसेच खरेदीदारांनी त्यांचे दुकानाचे (Certificate of Registration from Register of companies or Register of Firms or Letter of Proprietorship, valid Shop Act registration) तसेच मागील तीन वर्षाचे भरलेले (Income Tax clearance Certificate, Pan Card) स्वतंत्र पाकिटात सिलबंद करुन वरती दर्शविल्याप्रमाणे दि. 11/02/2025 पर्यंत सादर करावेत.

8. सदर लिफाफ्यावर विद्युत अभि. स्थापत्य अभि. व ग्रंथालय विभागातील लिलावात काढलेली उपकरणे/यंत्रसामुग्री खरेदी करण्यास दिलेले दरपत्रक असे ठळक अक्षरात नमुद करावे.

9. विक्रीबाबतचे संपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी स्वतःकडे राखुन ठेवले आहेत.

10. सुरक्षा ठेव रु. 10,000/- (अक्षरी रु. दहा हजार मात्र) रक्कमेचा डीडी प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,(औरंगाबाद) छत्रपती संभाजीनगर यांचे नावे काढुन दरपत्रकासोबत जोडावा. कुठल्याही बँकेचा धनादेश स्वीकारला जाणार नाही.

11. निविदांचे आर्थिक मुल्यमापन पुर्ण झाल्यानंतर 15 दिवसांच्या आत अयशस्वी बोलीदारांची सुरक्षा ठेव त्यांना परत केली जाईल.

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

टिप- सदर उपकरणे इच्छुक खरेदीदारांना पाहण्यासाठी तसेच माहितीसाठी संबंधित विभागात ठेवलेली आहेत. ती आपणास कार्यालयीन दिवशी सकाळी 11.00 ते संध्याकाळी 04.00 वेळेत पाहण्यास मिळेल.

प्रत- 1) मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सादर.

2) संस्थेतील सर्व विभागप्रमुख यांना आपापल्या विभागातील मुख्य सुचना फलकावर प्रदर्शित करण्यास्तव अग्रेषित.

3) विभागप्रमुख संगणक, व प्रोग्रामर यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यास्तव अग्रेषित.

4) संस्थेच्या लेखा विभागास माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
"In Pursuit of Technical Excellence"
- office: (0240) 2366101, 2366102, 2366111
e-mail – office.gecoeaurangabad@dtemaharashtra.gov.in web : www.geca.ac.in

जा.क्र.शाअमछसं/स्थापत्य/निर्लेखन/ 2024-25/556 दिनांकः- 31 JAN 2025

# जाहीर लिलाव विक्री

संस्थेतील स्थापत्य विभागातील,जुनी पुराणी,निरुपयोगी उपकरणे व यंत्रसामुग्री, लोखंडी व लाकडी तुटलेले निरुपयोगी फर्निचर, लोंखंडी भंगार इ.वस्तूंचा लिलाव विक्री ''आहे त्या स्थितीत'' लिफाफा पध्दतीने करावयाचा आहे. त्यासाठी नोंदणीकृत खरेदीदाराकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. लिलाव करावयाच्या वस्तु संस्थेत दि.03/02/2025 ते दि.07/02/2025 या दरम्यान सकाळी 11.00 ते संध्याकाळी 04.00 वाजेपर्यंत पहावयास मिळतील. त्याच दरम्यान निविदा अर्ज रु.1000 (अक्षरी रु. एक हजार फक्त, ना परतावा) किमतीत विकत घेता येईल.

पूर्ण भरलेले निविदा अर्ज रु.10,000/-( अक्षरी रु. दहा हजार फक्त) अनामत रक्कमेसह राष्ट्रीयकृत बॅकेच्या डी.डी.स्वरुपात 'प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, (औरंगाबाद) छत्रपती संभाजीनगर' या नावे काढून दि.03/02/2025 ते दि.11/02/2025 या दरम्यान कार्यालयीन वेळेत सीलबंद पाकीटात कार्यालयात जमा करावे. सर्व सीलबंद निविदा दि.13/02/2025 रोजी दुपारी 2.00 वाजता विभागप्रमुख स्थापत्य अभि. यांच्या कक्षात उघडण्यात येतील.

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर